संच : ब

# ७ वी मराठी

महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र

शैक्षणिक प्रगती चाचणी

पायाभूत चाचणी २०१७-१८ : इयत्ता - सातवी

विषय : मराठी (लेखी)

विद्यार्थ्याचे नाव : ______

शाळेचे नाव : ______ दिनांक : / /२०१७

केंद्र : ______ ता. ______ जि. ______ प्राप्त गुण : [ ]

हजेरी क्रमांक : [ ] तुकडी : ______ शिक्षकाची स्वाक्षरी ______ एकूण गुण : ५०

**प्रश्न १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ______ २) ______

३) ______ ४) ______

५) ______ ६) ______

७) ______ ८) ______

९) ______ १०) ______



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 7th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न २ ते ४ साठी :** हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

असाच काल सकाळी तो कार्यालयामध्ये विकाससाठी पाण्याची बाटली घेऊन आला होता. त्याने एक पाण्याची बाटली विकासच्या साहेबांनाही दिली. त्या वेळी साहेब म्हणाले, 'वीस रुपये सुट्टे नाहीत. शंभराची नोट आहे.' त्यावर राजू म्हणाला, 'सर, द्या ती नोट. मी ऐंशी रुपये आपल्याले आणून देतो.' साहेबांची शंभर रुपयांची नोट घेऊन राजू गेला तो अद्याप आलाच नाही. राजूने साहेबांना खरंच फसवले असेल का? काय झाले असेल नक्की? विकास विचारात गढला. तेवढ्यात 'सर, आत येऊ का? राजूच्याच वयाचा एक मुलगा दारात उभा राहून विचारत होता. साहेब आणि विकासने आधी त्या मुलाकडे अन् मग एकमेकांकडे पाहिले. मग साहेब म्हणाले, 'ये, बोल. काय काम आहे?'

सर, मी इरफान, राजूचा मित्र. बोलता बोलता त्याने खिशातून शंभराची नोट काढली. ती नोट साहेबांसमोर धरत इरफान म्हणाला, 'सर, ही नोट राजूने तुम्हाला द्यायला सांगितली आहे.'

विकास आणि साहेब दोघेही चकित झाले. 'राजू कुठंय? विकासने विचारले, 'सर, तो कालच गावाला गेला.' साहेब म्हणाले, 'का?' 'त्याच्या आईची दवाखान्यातून सुट्टी झाली. गावी जाण्याआधी त्याने ही नोट मला तुम्हाला द्यायला सांगितली होती.' असे म्हणत इरफान आला तसा बाहेर पडला.

विकास आणि साहेब दोघेही थोडा वेळ स्तब्ध झाले. मग साहेब म्हणाले, 'विकास, मला माफ करा. माणसं ओळखण्यातला तुमचा अधिकार मोठा आहे. त्या मानाने मी फार अनुभवशून्य आहे. या नोटेतले ऐंशी रुपयेच माझे आहेत; पण बाकी वीस रुपयांचं काय?' यावर विकासही निरुत्तर झाला.

**प्रश्न २.** राजूच्या मित्राचे नाव खालीलपैकी कोणते? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) विकास    ब) इरफान    क) साहेब

**प्रश्न ३.** राजूचा स्वभाव कसा असेल ते ओळखून योग्य पर्यायाला गोल कर. (गुण २)

अ) प्रामाणिक    ब) बेफिकीर    क) रागीट

**प्रश्न ४.** राजू गावाला का गेला असावा? (गुण २)

________________________________________

________________________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 7th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न ५ ते ७ साठी :** खाली दिलेली कविता वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

**माय**

हंबरून वासराले चाटते जव्हा गाय
तिच्यामंदी दिसते मले तव्हा माही माय ।।ध्रु०।।

फनकाट्या येचायले माय जाये रानी
पायात नसे वहान साधी हिंडे अनवानी
इचू काट्यालेबी तिचा मोजत नव्हता पाय ।।१।।

सुट्टीमंदी जव्हा मी येत होतो घरी
उसनं पासनं आणून खाऊ घाले नानापरी
करू नको घाई म्हणे पोटभरं खाय ।।२।।

बाप माहा रोज लावे मायच्या मागं टुमनं
बस झालं शिक्शन याचं घेऊ दे हाती रूमनं
शिकूनशानी कुठं मोठा सायेब होनार हाय ।।३।।

(स. ग. पाचपोळ)

**प्रश्न ५.** मुलाची आई अनवाणी काय वेचायला जात असे? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) करवंद  ब) बोरं  क) फनकाट्या

**प्रश्न ६.** कवी सुट्टीत घरी आल्यावर आई त्याच्यासाठी काय करत असे ते लिही? (गुण २)

________________________________________

________________________________________

**प्रश्न ७.** मुलाचा बाप मुलाच्या मागे रोज कोणतं टुमनं लावत असे ते लिही? (गुण २)

________________________________________

________________________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 7th - B \Proof-II\19-06-17\GJ

**संच : ब**

**प्रश्न ८ ते १० साठी :** हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

नरेंद्र इतर मुलांप्रमाणेच शाळेत जात असे. एके दिवशी वर्गात शिक्षक शिकवीत होते आणि त्यावेळी काही विद्यार्थी आपसांत बोलत होते. नरेंद्रही त्यांच्यात होता. शिक्षकांनी सगळ्या मुलांना उभं केलं आणि ते जे शिकवीत होते त्याविषयी प्रश्न विचारला. पण कोणत्याही विद्यार्थ्याला उत्तर देता आलं नाही. परंतु नरेंद्रने मात्र त्या प्रश्नाचं बरोबर उत्तर दिलं. तो जरी बोलत असला तरी एकीकडे त्याचं शिक्षकांच्या शिकवण्याकडेही लक्ष होतं.

नरेंद्रने बरोबर उत्तर दिल्यामुळे शिक्षकांनी त्याला सोडून इतर सर्व मुलांना ती बोलत होती म्हणून उभं राहण्याची शिक्षा दिली. तेव्हा नरेंद्र म्हणाला, ''सर, मलाही शिक्षा झाली पाहिजे, कारण मीही बोलत होतो'' असं म्हणून इतर मुलांबरोबर तोही उभा राहिला.

सत्याची कास न सोडणे हेही जीवन पवित्र बनविणारं महान कार्य आहे.

**प्रश्न ८.** वर्गातील इतर मुलांप्रमाणे नरेंद्रही बोलत होता. मग, (गुण १)

________________________________________

**प्रश्न ९.** तुम्ही वरील कथेतून कोणता बोध घ्याल? (गुण २)

________________________________________

________________________________________

**प्रश्न १०.** नरेंद्रने उत्तर बरोबर दिल्यामुळे काय झाले ते पर्यायातून निवड व योग्य पर्यायाला गोल कर. (गुण २)

अ) शिक्षकांनी त्याला शिक्षा केली.

ब) शिक्षकांनी त्याला घरी सोडले.

क) शिक्षकांनी त्याला शिक्षा केली नाही.



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 7th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न ११ ते १३ साठी :** हा लेख वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

आयुष्यात खूप मोठे व्हावे, यशस्वी व्हावे, चांगल्या मार्गाने हवा तेवढा पैसा मिळवावा, मानमरातब मिळवावा, पण प्रथम चांगला माणूस व्हावे, हे आपण पाहिले. आता प्रश्न असा येतो, कसा असतो चांगला माणूस? काय असतात चांगल्या माणसाची लक्षणे? ती आपण पाहूच, पण प्रथम हे लक्षात ठेवायला हवे, की जन्मत: कुणीच वाईट नसतो. माणूस हा खरे म्हणजे स्वभावत: चांगलाच असतो, पण हळूहळू इतरांकडे पाहून आलेल्या काही अनुभवांमुळे, योग्य मित्र अथवा मार्गदर्शन न मिळाल्यामुळे माणूस बदलत जातो. अयोग्य, चुकीचे, क्वचित वाईटही वागू लागतो. हे कशामुळे होते?

एखादा माणूस खूप स्वार्थी आहे, असे आपण म्हणतो. जो स्वार्थी नसतो, तो चांगला माणूस असतो का? हे जरा नीट समजून घ्यायला हवे. मित्रहो, स्वार्थ म्हणजे काय? तर स्वत:चे हित. आता आपले स्वत:चे हित तर बघावेच लागते. आपले हित आपण जपायचे नाही तर कुणी? आपला उत्कर्ष आपण साधायचा नाही, तर कुणी? तेव्हा हा स्वार्थच असतो आणि तो स्वाभाविकच असतो, पण हे लक्षात ठेवायला हवे, की जसा आपल्याला स्वार्थ असतो, तसा दुसऱ्यांनाही असतो. त्यांनाही त्यांचे हित जपायचे असते.

थोडक्यात स्वत:चे हित साधताना दुसऱ्याचे अहित करता कामा नये. स्वत:च्या फायद्यासाठी कधीही दुसऱ्याचे नुकसान करायचे नाही. असे वागावे, असे करावे ज्यात दोघांचाही फायदा असेल. यालाच इंग्रजीत 'विन विन' असे म्हणतात. चांगला माणूस हा प्रामाणिक असतो. तो स्वत:च्या भल्यासाठी कधीही इतरांचे नुकसान करत नाही.

चांगला माणूस हा प्रसंगी दुसऱ्यांना मदतही करतो, पण ते त्याच्यावर उपकार म्हणून नव्हे, तर ती करताना त्याला एक समाधान मिळत असते म्हणून. चांगला माणूस अशी मदत करतो आणि विसरून जातो. यालाच 'नेकी कर और दर्या में डाल' असे म्हटले जाते.

**प्रश्न ११.** दोघांचाही फायदा असेल तर त्याला इंग्रजीत काय म्हणतात? (गुण १)

______________________________

**प्रश्न १२.** स्वार्थ म्हणजे काय? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण २)

अ) स्वत:चे हित ब) दुसऱ्याचे हित क) दुसऱ्याचा उत्कर्ष

**प्रश्न १३.** चांगला माणूस होण्याकरिता आवश्यक असणाऱ्या उताऱ्यातील दोन बाबी लिही. (गुण २)

______________________________

______________________________

______________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 7th - B \Proof-II\19-06-17\GJ

## संच : ब

**प्रश्न १४.** खालील वाक्यातील अधोरेखित नामांचे प्रकार लिही. (गुण २)

अश्विनीला सशाची चपळाई आवडली.

______________________________

______________________________

**प्रश्न १५.** पुढील प्रसंग वाच व त्याला अनुरूप वाक्प्रचार ओळख.
योग्य उत्तराला गोल कर. (गुण १)

बिरबल म्हणजे अकबर बादशहाच्या दरबारातील एक रत्नच! त्याला कोणताही प्रश्न विचारा त्याचे उत्तर तयार! त्यामुळे तो सर्वांच्या ________ होता.

अ) दीड शहाणा  ब) गळ्यातला ताईत  क) अकलेचा कांदा

**प्रश्न १६.** रिकाम्या जागी कंसातील क्रियापदाचे योग्य रूप लिही. (गुण १)

अ) आईने नीताला प्रश्न ________ (विचारणे)

ब) मंदार गाणी छान ________ (म्हणणे)

**प्रश्न १७.** खालील मजकुरात कंसातील योग्य सर्वनामांचा वापर कर. (गुण २)
(आम्ही, माझे, आमची, मला)

बाबांनी ________ रंगपेटी आणली. आता ______ मित्र येतील. मग ______ चित्र रंगविण्याचा सराव करू. उद्या ________ चित्रकलेची स्पर्धा आहे.

**प्रश्न १८.** 'प्रचंड' आणि 'जाडेभरडे' या विशेषणांचा वापर करून प्रत्येकी एक वाक्य लिही. (गुण २)

______________________________

______________________________

______________________________

## संच : ब

**प्रश्न १९.** पुढील वाक्यातील कर्ता व कर्म ओळख.

समीरने आंबा खाल्ला. (गुण १)

कर्ता : ____________________

कर्म : ____________________

**प्रश्न २०.** खालील वाक्यातील विशेषण व विशेष्य ओळख. (गुण १)

बागेत टवटवीत फुले होती.

विशेषण : ____________________

विशेष्य : ____________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 7th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न २१.** खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे संवाद तयार करून लिही. (गुण ५)

घरून शाळेत येताना निखिलने शाळेतील इ. ३ री तील मित्राचा अपघात झाला असता, दवाखान्यात नेऊन, त्याला घरी सोडले त्यामुळे निखिलला शाळेत जायला उशीर झाला. तेव्हा वर्गशिक्षक व निखिल यांच्यामधील संवाद कल्पना करून लिही.



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 7th - B \Proof-II\19-06-17\GJ

## संच : ब

**प्रश्न २२.** खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर कल्पना करून तू तुझ्या भाषेत लिही. (गुण ५)

१) पुस्तके बोलू लागली तर... २) आई संपावर गेली तर...

३) सिग्नल बंद झाले तर..... ४) शाळेत माकड आले तर....



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 7th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न २३.** मावशीच्या लग्नाला जाण्याकरिता वर्ग शिक्षकांकडून ५ दिवसांची रजा काढण्याकरिता पत्र लिही. (गुण ५)

■■■



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 7th - B \Proof-II\19-06-17\GJ*